Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

### प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक २] शुक्रवार, जानेवारी १५, २०२१/पौष २५, शके १९४२ [ पृष्ठे २, किंमत : रुपये १८.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३.

### आयुक्त, महानगरपालिका, यांजकडून

क्रमांक मनपाना-नरवि-कलम-१२४बी-२०६-२०२१.—

नागपूर शहराची सुधारित विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र.३००(अ)-९७-नवि-९, दि. ७ जानेवारी, २००० अन्वये मंजूर झाली असून ती दि. १ मार्च, २००० पासून अंमलात आली आहे, तसेच नागपूर शहराची सुधारित विकास नियंत्रण नियमावली शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६८४-प्र.क्र.२३५-२०१४-नवि-९, दि. ३१ मार्च, २००१ अन्वये मंजूर झाली असून ती दि. ९ एप्रिल २००१ पासून अंमलात आली आहे. शासनाने निर्णय क्र. नासुप्र-३३१३-प्र.क्र.४१-नवि-७, दि. ३०-०१-२०१४ अन्वये नागपूर मेट्रो मार्ग प्रकल्पास मान्यता दिली आहे.

आणि तसेच शासनाने अधिसूचना क्र. एमआरडी-३३१६-प्र.क्र.२४-(१)-नवि-७, दि. ३०-०६-२०१६ अन्वये नागपूर मेट्रो रेल्वेचे मार्गीका खालीलप्रमाणे निश्चित केल्या आहेत.

(१) ऑटोमोटीव्ह ते मिहान (उत्तर-दक्षिण मार्गीका)

(२) प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर, (पूर्व-पश्चिम मार्गीका)

वरील दोन उन्नत मेट्रो रेल्वे मार्गीका प्रकल्पास ‘ महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प ’ म्हणून शासनाने घोषित केले आहे, शासनाने दि. ३०-०१-२०१४ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्ट-३ मधील अ.क्र. (i) व (ii) मध्ये नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी निधी उभारण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या आर्थिक स्त्रोताबाबत खालीलप्रमाणे नमूद आहे.

(i) मेट्रो मार्गिकाच्या दोन्ही बाजूस ५०० मी. अंतरापर्यंत येणा-या जमिनीवर अधिमूल्य आकारून ४ चटईक्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत अतिरिक्त चटईक्षेत्र (एफ.एस.आय.) देण्याची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत करून त्यानुसार अधिमुल्याची रक्कम संबंधित नियोजन प्राधिकरणाने वसूल करणे व त्यापैकी ५०% रक्कम पायाभूत सुविधांच्या सुधारणांसाठी स्वतःकडे ठेवून घेऊन उर्वरित ५०% रक्कम सदर प्रकल्पासाठी नियुक्त एस.पी.व्ही. यांस देणे.

(ii) शासन अधिसूचित करेल असे महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणा-या शहरात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना, अधिनियम, १९६६ च्या तरतुदीनुसार आकारण्यात येणारे विकास शुल्क १००% पर्यंत वाढ करून आकारण्याविषयी कायद्यात तरतूद करणे व त्यानुसार वसूल होणारी वाढीव रक्कम अशा प्रकल्पासाठी वापरणे.

वरील परिशिष्ट ३ च्या अ.क्र. (i) च्या अनुषंगाने नागपूर शहराच्या उक्त मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये Transit Oriented Development करीता काही परिभाषांसह नवीन तरतूद क्र. ४०, परिच्छेद “ W ” समाविष्ट करण्यासंबंधीच्या प्रस्तावात शासन निर्णय क्र. टिपीएस-२४१४-४७७-प्र.क्र.२४८-२०१४-नवि-९, दि. ०९-०६-२०१७ अन्वये मंजुरी देण्यात आलेली होती.

तथापि, राज्य शासनाकडे लोक प्रतिनिधी, हितसंबंधित वास्तु विशारद, विकासक संस्था विविध निवेदने प्राप्त झाली आहेत. उक्त निवेदनाद्वारे त्यांनी उक्त विनियमामध्ये समास अंतरे, बाल्कनी, बेसमेंट रॅम्प इत्यादीबाबत फेरविचार व्हावा अशी विनंती केली असल्याने शासनाने दि. ०९-०६-२०१७ रोजीच्या अधिसूचनेत प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने प्रसिद्धी देऊन व त्यावरील वैधानिक कार्यवाही पूर्ण करून उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक)(ग) अन्वये प्रदत्त अधिकारांचा वापर करून शासनाने Transit Oriented Development च्या नियमावलीत काही प्रस्तावित केलेल्या फेरबदलास निर्णय क्र. टिपीएस-२४१४-४७७-प्र.क्र.२४८(भाग-१)-२०१४-नवि-९, दि. २ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या अधिसूचनेसोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या बाबीनुसार मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार त्या भागातील विकास परवानगी देतेवेळी विकास शुल्क आकारणी करणेची कार्यवाही सुरू असून मेट्रो मार्गीकेच्या ५०० मी. अंतरादरम्यानच्या विकास परवानगी प्रकरणी अनुज्ञेय अतिरीक्त चटईक्षेत्र निर्देशांकांवर अधिमूल्य आकरणीच्या एकूण रक्कमेतील ५०% रक्कम पायाभूत सुविधासाठी महानगरपालिकेकडे राखून ठेवून उर्वरीत ५०% रक्कम महामेट्रोकडे परस्पर भरणा करणेची कार्यवाही सुरू आहे.

उक्त परिशिष्ट क्र.-३ च्या अ.क्र. (ii) च्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२४-ब नुसार विकास वा बांधकाम परवानगी प्रकरणी आकारणी करावयाच्या विकास आकाराबाबतची तरतूद आहे. उक्त अधिनियमाच्या कलम-१२४(२-१अ) मध्ये राज्य शासनाने एक किंवा त्यापेक्षा अधिक महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प हाती घेण्याचा आपला इरादा जाहीर केला असेल त्याबाबतीत या अधिनियमातील कोणताही नियोजन प्राधिकरणाचा किंवा नवीन नगर रचना प्राधिकरणाचा अधिकारी ते खालील क्षेत्राच्या संबंधात पोट-कलम (२) च्या तरतुदीन्वये बसविण्यात आणि वसूल करण्यात आलेल्या विकास आकारात शंभर टक्क्यांनी वाढ करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

नागपूर शहराकरीता मेट्रो रेल नागरी परिवहनाचा प्रकल्प जाहीर झाल्यामुळे वरीलप्रमाणे विकास आकारामध्ये १००% वाढ करण्याबाबत तसेच विकास आकारामध्ये वाढ करून सदर विकास आकाराचा निधी “ नागरी वाहतुक निधी ” मध्ये ठेवून त्याचा विनियोग सदर मेट्रो प्रकल्पासाठीच्या एकूण खर्चातील नागपूर महानगरपालिकेची ५% हिस्स्याची रक्कम नागपूर मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड या मेट्रो प्रकल्पाकरीता स्थापन केलेल्या एस.पी.व्ही. कंपनीकडे वर्ग करण्यास शासनाने उपरोक्त निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ब(२-१अ) मध्ये खालील प्रमाणे तरतूद नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहे.

कलम १२४ब(२-१अ)—राज्य शासनाने, एक किंवा त्यापेक्षा अधिक महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प हाती घेण्याचा आपला इरादा जाहीर केला असेल त्याबाबतीत या अधिनियमाखालील कोणत्याही नियोजन प्राधिकरणाच्या किंवा नवीन नगरविकास प्राधिकरणाच्या अधिकारीतेखालील क्षेत्राच्या संबंधात, पोट-कलम (२) च्या तरतुदींन्वये बसविण्यात आणि वसूल करण्यात आलेल्या विकास आकारात, शंभर टक्क्यांनी वाढ करण्यात येईल, असे नमूद आहे.

त्याअनुषंगाने शासनाने नागपूर शहराकरीता मेट्रो रेल महत्वपूर्ण नागरी वाहतुक प्रकल्प घोषित केल्यामुळे नागपूर शहराकरीता अधिसूचित क्षेत्रामध्ये उक्त अधिनियमाच्या कलम १२४ब(२) च्या तरतुदीन्वये बसविण्यात आणि वसूल करण्यात आलेल्या विकास आकारामध्ये उक्त अधिनियमातील कलम १२४ब(२-१अ) मधील तरतुदीनुसार विकास आकारात १००% वाढ करणे आवश्यक आहे.

तसेच शासनाने निर्णय क्र. एम.आर.डी.-३३१६-प्र.क्र.२४-(१)-नवि-७, दि. ३०-०६-२०१६ अन्वये महाराष्ट्र शासन सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७ नुसार सुधारित केलेल्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२४ब(२-१अ) च्या प्रयोजनार्थ नागपूर महानगर प्रदेशातील नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा (१) ऑटोमोटीव्ह ते मिहान (उत्तर-दक्षिण मार्गीका), (२) प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर (पूर्व-पश्चिम मार्गीका) या दोन उन्नत मेट्रो रेल्वे मार्गिकांच्या प्रकल्पास “ महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प ” घोषित करण्यात आलेले आहे. त्यामुळे उक्त अधिनियमाचा कलम १२४ब(२-१अ) मधील तरतुदीनुसार अधिनियमाच्या कलम-१२४ब (२) च्या तरतुदीन्वये बसविण्यात आणि वसूल करण्यात आलेल्या विकास आकारामध्ये अपेक्षित १००% वाढ नागपूर नियोजन प्राधिकरण क्षेत्रात दिलेल्या विकास परवानगीच्या अनुषंगाने वसूल करणे आवश्यक आहे. याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ब (२-१अ) मधील तरतुदीनुसार अधिनियमाच्या कलम १२४ब(२) च्या तरतुदीन्वये बसविण्यात आणि वसूल करण्यात आलेल्या विकास आकारामध्ये अपेक्षित १००% वाढ भूतलक्षी प्रभावाने म्हणजेच दि. ३०-०६-२०१६ पासून नागपूर नियोजन प्राधिकरण क्षेत्रात दिलेल्या विकास परवानगीच्या अनुषंगाने वसूल करणे आवश्यक असून त्यानुसार कार्यवाही करणेबाबत शासनाने पत्र क्र. टिपीएस-२४२०-७११-प्र.क्र. ९२-२०२०-नवि-९, दि. ०३-११-२०२० रोजी निर्देशित केलेले आहे. त्यानुसार सदर सूचना वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून उक्त विकास आकारमध्ये केलेली वाढ अंमलात आणून वसूल करण्यात येईल.

**राधाकृष्णन बी.** (भा.प्र.से.),
आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

नागपूर :
दिनांक ७ जानेवारी २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.